**प्रकल्प प्रवर्तक मे. आशीर्वाद इंडस्ट्रीज यांचा गट क्रमांक १४७/अ, गांव-सुखेड, तालुका खंडाळा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथील विद्यमान जागेत कार्यरत इथेनॉल प्रकल्पात प्रस्तावित इथाइल एसिटेट - ४०.० टीपीडी उत्पादन क्षमता प्रकल्प उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. आशीर्वाद इंडस्ट्रीज यांचा गट क्रमांक १४७/अ, गांव-सुखेड, तालुका-खंडाळा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथील विद्यमान जागेत कार्यरत इथेनॉल प्रकल्पात प्रस्तावित इथाइल एसिटेट - ४०.० टीपीडी उत्पादन क्षमता प्रकल्प उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थान मे. आशीर्वाद इंडस्ट्रीज यांचा गट क्रमांक १४७/अ, गांव-सुखेड, तालुका-खंडाळा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. अमोल आ. सातपुते, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी मा. श्री. नागेश पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, श्री. बाबासाहेब कुकडे, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या असलेल्या स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन यांचे जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांच्यावतीने स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ मधील परिशिष्ट "अ" व "ब" नुसार व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९, जून, २०१४ आणि एप्रिल, २०२२ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार सदरहू प्रकल्प हा मध्ये संवर्ग "ए" ५ (एफ) -सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स



Scanned with OKEN Scanner

अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी दिनांक २४/०३/२०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक २८/०३/२०२५ व्दारे प्रस्तावित प्रकल्पास संदर्भ व अटी (TOR) मंजूर केलेला आहे.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्ती करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण डिसेंबर, २०२४ ते सप्टेंबर, २०२५ (दहा महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. आशीर्वाद इंडस्ट्रीज यांचा गट क्रमांक १४७/अ, गांव-सुखेड, तालुका-खंडाळा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथील विद्यमान जागेत कार्यरत इथेनॉल प्रकल्पात प्रस्तावित इथाइल एसिटेट - ४०.० टीपीडी उत्पादन क्षमता प्रकल्प उभारणी करणे संदर्भात येथे उभारणी करणे संदर्भात प्रकल्प प्रवर्तक यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई मुख्यालयाकडे दिनांक १६/०६/२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केला व प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याबद्दल मागणी केली

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्र.एमपीसीबी/जेडी (डब्ल्यूपीसी)/ईएव्ही-पीएच/बी-२५०६२४-एफटीएस-



Scanned with OKEN Scanner

०११६ दिनांक २४/०६/२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी पत्र क्र.एमपीसीबी/एसआरओएसटी/२५०८१४-एफटीसी-०२१३ दिनांक १४/०८/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, सातारा यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी करीता तारीख व वेळ देण्याबाबत विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३१-१०-२०२५ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८७/२०२५, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२५१२०५- एफटीएस -०२८० दिनांक ०५/१२/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, सातारा,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी<br>प्रादेशिक अधिकारी -पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे | - सदस्य |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा | - आयोजक |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत १५-११-२०२५ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज ( मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश

अहवाल ) लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा
३. जिल्हा उदयोग केंद्र , सातारा
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईंट , ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र ८ , सायन सर्कल समोर, सायन (पूर्व) , मुंबई- ४०००२२ .
५. प्रादेशिक अधिकारी , म. प्र. नि. मंडळ , जोग सेंटर, ३ रा मजला , वाकडेवाडी, जुना पुणे -मुंबई रोड पुणे ४११ ००३
६. पर्यावरण विभाग, नविन प्रशासकीय भवन १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई- ३२
७. उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नविन प्रशासकीय इमारत २ रा मजला एसटी स्टँडच्या पाठीमागे , सदरबझार सातारा.
८. क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर -४४०
९. तहसील कार्यालय,खंडाळा,तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा.
१०. ग्रामपंचायत कार्यालय § सुखेड, धावडवाडी, घाटदरे, बोरी, अहिरे, खेड बुद्रुक, कराडवाडी,वागोशी, मोर्वे, म्हावशी, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा
११. संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई कार्यकारी सारांश अहवाल हा इंग्रजी व मराठीत संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे

आयोजक यांनी आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना एकही सूचना/आक्षेप प्रत्यक्ष अथवा ई मेल द्वारे प्राप्त झाले नसलेबाबत सांगितले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास तशी संधी प्रकल्पाबाबतचे सादरीकरण झाल्यानंतर देण्यात येईल असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात

आलेल्या सूचना, आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेऊन पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे करण्यात येईल असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण सादर केले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी की प्रकल्प प्रवर्तक मे. आशीर्वाद इंडस्ट्रीज यांच्या गट क्रमांक १४७/अ, गांव-सुखेड, तालुका-खंडाळा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथील विद्यमान जागेत कार्यरत इथेनॉल प्रकल्पात प्रस्तावित इथाइल एसिटेट - ४०.० टीपीडी उत्पादन क्षमता प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पासाठी अतिरिक्त भूखंड लागणार नाही. प्रस्तावित प्रकल्पाचा खर्च अंदाजे ५.७५ कोटी रुपये आहे. तसेच भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार सदरहू प्रकल्प संवर्ग ए ५ (एफ) - सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स अंतर्गत मोडत असल्याने प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून पर्यावरण अनुमती प्राप्त करणे बंधनकारक असून त्यासाठीच आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेची संपूर्ण माहिती देताना सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा झेडएलडी - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे, म्हणजे प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही. पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च - रुपये ८२.३९ लाख, तर आवर्ती खर्च-९.२३ लाख प्रतिवर्ष राखीव ठेवण्यात आलेला आहे. प्रकल्पासाठी बांधकाम टप्प्यात ३० व्यक्तींची तर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर १५ व्यक्तींची आवश्यकता लागणार असून स्थानिकांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यास प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. सूचना मांडण्यापूर्वी प्रथम आपले नांव व गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री संग्राम धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा:-**

येथे बैठकीत उपस्थित असलेल्यांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. मात्र येथे असे निदर्शनास येते की येथील ५०% पेक्षा जास्त लोक हे सुखेड गावातील व आजूबाजूच्या परिसरातील नाही. तरीही त्यांनी रजिस्टरमध्ये सुखेड गावातील रहिवाशी असल्याचे लिहिलेले आहे. आम्ही गावात राहत असून संबंधित व्यक्तींना पाहिलेले नाही. तरी नावे घेतलेल्या व्यक्तींनी उभे राहावे व त्यांच्याकडे मतदार कार्ड, आधार कार्ड असल्यास ते दाखववे, म्हणजे आम्हांलाही कळेल की ते आमच्या गावातील आहेत. त्यांनी सर्व नांवे वाचून दाखविली.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांच्या कर्मचा-यांनी सांगितले की आम्ही या स्थानावर असल्याने गावाचे नांव लिहिलेले आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधितांना त्यांच्या निवासी गावाचे नांव/मूळ गांव लिहिण्याची सूचना केली.**

श्री संग्राम धायगुडे यांनी प्रश्न विचारला कार्यरत प्रकल्पात उत्पन्न होणा-या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया व त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येते याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. कारण आम्ही मिडियामधील कार्यरत व्यक्तींना बोलावून दाखविलेले आहे. प्रकल्प स्थानाच्या मागच्या बाजूस मेंढपाळ समाज वास्तव्यास आहे. तेथे कंपनीतील औद्योगिक सांडपाणी सोडण्यात येते. तेथील पाणी पायल्याने ५० बक-या मरण पावलेल्या आहेत. त्यास कोण जबाबदार आहे? त्यांनी आक्षेप नोंदविला की आजूबाजूच्या शेतीवर कंपनीने सोडलेल्या औद्योगिक सांडपाण्याचा दुष्परिणाम झालेला आहे. आताच बैठकीनंतर परिसरात भेट दिल्यास तेही आताच निर्दशनास आणून देण्यात येईल.

**येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या तांत्रिक अधिका-यांना सद्यस्थितीबाबत स्पष्टीकरण करण्याची सूचना केली.**

श्री संग्राम धायगुडे यांनी आरोप नोंदविला की ज्या शेतक-यांच्या शेतात औद्योगिक सांडपाणी सोडण्यात येते, त्यास आमिष दाखवून लेखी तक्रार न करण्यास प्रवृत्त करण्यात येते. त्यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीच्या उत्पादन प्रकियेवेळी शेजारील पडळकरवस्तीस आवाजाचा खूपच त्रास होतो. आजूबाजूच्या वस्तीवर



Scanned with OKEN Scanner

राहणा-या वृध्द माणसांना, लहान मुलांना, आजारी लोकांना, रुग्णांना कंपनी कार्यरत असताना आवाजाचा खूपच त्रास होतो.

प्रकल्प प्रवर्तकांचे तांत्रिक अधिकारी यांनी कबूलीजबाव दिला की गेल्या वर्षी प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी हे कॅनॉलमध्ये गेलेले होते. मात्र आता ते सर्व दुरुस्त करण्यात आलेले आहे.

त्यावेळी संग्राम धायगुडे यांनी आक्षेप नोंदविला की ते गेले का आपण सोडले?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पावसाच्या पाण्यातून पाझरुन प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी हे कॅनॉलच्या पाण्यात मिसळलेले होते.

श्री संग्राम धायगुडे यांनी आक्षेप नोंदविला की २५० मीटर लांब पाणी जाऊ शकेल का? प्रकल्पाच्या खालच्या बाजूस कॅनॉल आहे. त्यात कंपनी औद्योगिक सांडपाणी सोडते. तसेच प्रकल्पाच्या दुस-या बाजूस सांडपाणी सोडण्यात येते. प्रकल्पातून औद्योगिक सांडपाणी सोडणारा ट्रक हा मातीत रुतून स्थानिक लोकांच्या विहिरीत पाणी जाते. ब-याच लोकांच्या तक्रारी येत असतात. तेथील लोकांची विहिरीचे पाणी, शेती खराब झालेली आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पूर्वी ज्या गोष्टी झाल्या, त्याचा विचार करण्यात येऊ नये. त्या सर्व त्रुटी दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत.

ग्रेथे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पात उत्पन्न होणा-या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (ईटीपी) हा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. आता ३.५० केएलडी औद्योगिक सांडपाणी निर्मिती होते. त्यावर ईटीपीत प्रक्रिया करुन ते औद्योगिक सांडपाणी हे प्रकल्पातच कुलिंग टॉवरसाठी वापरण्यात येते.

तसेच प्रस्तावित प्रकल्प हा शून्य द्रव निस्सारण (झेडएलडी § Zero Liquid Discharge) असेल. प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

त्यावेळी श्री संग्राम धायगुडे यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पातील त्रुटी दूर करुन जर प्रदूषणाचा त्रास न होता प्रकल्प राबविला, तरच ग्रामस्थांची परवानगी मिळेल, नाही तर प्रस्तावित प्रकल्पास मान्यता देणारच नाही.

श्री संग्राम धायगुडे यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीच्या औद्योगिक सांडपाण्याची सद्यस्थिति ही भयानक आहे. तसेच प्रकल्पात तीन वेळा स्फोट झालेला आहे. परिसरातील लोकांच्या जीवीताला धोका आहे.

येथे उपस्थितांनी एकत्रित आक्षेप नोंदविला की स्फोट झाल्यानंतर प्रकल्पातील कामगार हे प्रकल्पाच्या दुस-या बाजूस धावत जातात. प्रकल्पाच्या बाजूलाच निवासी



Scanned with OKEN Scanner

वस्ती आहे. त्यांच्या जीवीताला प्रकल्पापासून धोका आहेच. प्रकल्पाला लागूनच शेती आहे. शेतीचेसुध्दा नुकसान होत आहे. कंपनीच्या खालच्या बाजूस कॅनॉल आहे, त्यात औद्योगिक सांडपाणी सोडण्यात येते. जवळच गावाला पाणी पुरवठा करणारी विहिर आहे. त्याचे पाणी प्रदूषित होत असते.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की विहिरीबाबत सर्व अडचणी, प्रश्न दुर करण्यात आलेल्या आहेत. कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी त्याबाबत पाहणी केलेली आहे. कंपनीने ग्रामपंचायत कार्यालयात त्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

परत काही उपस्थितांनी सामुहिकपणे मागणी केली की आता विहिरीच्या ठिकाणी सर्वांनी आमच्या सोबत यावे व पाहणी करावी. येथे श्री संग्राम धायगुडे यांनी मी स्वतः फी भरुन तेथील माती परिक्षण (Soil Samples Report) करण्याचे आश्वासन दिले. काही उपस्थितांनी सामुहिकपणे आक्षेप नोंदविला की गेले आठ दिवसात पाऊस झालेला नाही, मग आता तेथे पाणी कसे आहे? कंपनीतूनच गळती होऊन पाणी तेथे आहे. याबाबत कंपनी प्रशासनास त्वरित कळविण्यात आलेले आहे. कंपनी अवैधपणे, दडपशाहीने परिस्थिती हाताळत आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्थानिकांनी त्यांच्या ज्या काही तक्रारी असततील, त्या एकत्रित मांडाव्यात. मा.अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली त्या सोडविण्यात येतील.

**श्री संग्राम धायगुडे व इतर व्यक्ती यांनी** उभे राहून सांगितले की या कंपनीमुळे जीवीताला धोका आहे, कंपनीतून धूर बाहेर पडत असतो.

**श्री संग्राम धायगुडे** यांनी सांगितले की प्रकल्पाच्या विरुध्द आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयात उपोषणास बसणार आहोत. तसेच मा. पंतप्रधान कार्यालय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्पाविरुध्द तक्रारी पाठविणार आहोत. कंपनीस अवैधपणे परवानगी दिल्यास सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन प्रकल्पास विरोध करणार आहोत. कंपनी फक्त आश्वासन देते, बाकी काहीही करत नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ७० लाख खर्च करुन ईटीपी बांधलेला आहे. स्थानिकांनी त्यांचे प्रश्न मांडावेत, त्या सर्वांचे निरसर करण्यात येईल.

त्यावेळी श्री संग्राम धायगुडे व इतर व्यक्ती यांनी उभे राहून सांगितले की प्रथम कार्यरत प्रकल्पामुळे होणारे जल प्रदूषण, ध्वनि प्रदूषण त्रास व सुरक्षितता यातील त्रुटी पूर्ण केल्याशिवाय प्रस्तावित प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये. आमचा प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.



Scanned with OKEN Scanner

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी, सूचना, विचार, टीकाटिप्पणी वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते शासनास सादर करण्यात येईल. ही समिती प्रकल्पास मान्यता देत नाही, प्रकल्पाची शिफारससुध्दा करत नाही किंवा प्रकल्प नाकारत नाही. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यासाठी ही बैठक आहे. आपल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व ते शासनास सादर करण्यात येईल. प्रकल्पास मान्यता प्रदान करावयाची वा नाही याबाबत शासन पुढील निर्णय घेईल. तरी उपस्थितांनी आपल्या सूचना वा आक्षेप नोंदवावेत

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की जे आक्षेप उपस्थित करणार आहात, ते लेखी स्वरुपात १-२ दिवसात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा कार्यालयात सादर करण्यात यावेत.

उपस्थितांनी त्यावेळी लेखी आक्षेप सोबत आणल्याचे सांगितले. आयोजक यांनी ते सादर करण्यास सांगितले, त्याची पोच देण्यात येईल.

२) **श्री महेश महादेव धायगुडे, गाव-सुखेड,तालुका-खंडाळा,जिल्हा-साताराः-**

कंपनीने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कोणकोणते उपक्रम राबविलेले आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की यापूर्वी कार्यरत प्रकल्पास सीईआर -- कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधीची अंमलबजावणी करण्याची तरतुद लागू नव्हती. मात्र प्रस्तावित प्रकल्पास सीईआर उपक्रम राबविणे बंधनकारक आहे.

मात्र सीईआर उपक्रम राबविणे बंधनकारक नसतानाही प्रकल्प व्यवस्थाने प्रकल्प परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत, म्हणजे शाळेचे रंगकाम, जिर्णोधारासाठी देणगी व इतर कामे हाती घेतलेली आहेत. त्याचा जरी कागदोपत्री पुरावा ठेवलेला नाही. मात्र प्रस्तावित प्रकल्पात सीईआर निधीसाठी ८.६२ लाख एवढी रक्कम राखीव ठेवलेली असून मा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे तो निधी खर्च करण्यात येईल. तो निधी त्या त्या वेळी ग्रामपंचायतीस हस्तांतरित करण्यात येईल.

त्यावेळी उपस्थितांनी त्याबाबत पुरावा दाखविण्याची मागणी केली. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप हे उपस्थितांनी उपस्थित करावेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपापसात चर्चा न करता सूचना/आक्षेप उपस्थित करण्यात यावेत.

३) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

त्यांनी आवाहन केले की ग्रामस्थांच्या प्रस्तावित प्रकल्पाकडून ज्या काही अपेक्षा असतील, त्या उपस्थित करण्यात याव्यात. कार्यरत प्रकल्पाने केलेल्या चुका पडताळण्यासाठी/तपासण्यासाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक नाही. तरी जे काही सामाजिक उपक्रम त्या त्या गावात आवश्यक आहेत, त्याबाबत सूचना, विचार उपस्थित करण्यात याव्यात.

४) **श्री अनिकेत धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा:-**

ही कंपनी जेव्हा सुरु झाली, त्यावेळी अशी बैठक का आयोजित करण्यात आली नाही?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीस माहिती देताना सांगितलेले आहे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २०१६ नुसार काही विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance-EC) प्राप्त करणे आवश्यक आहे, त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक आहे. प्रस्तावित प्रकल्पातील उत्पादन हे विशिष्ट संवर्गात मोडत असल्याने ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

त्यावेळी श्री अनिकेत धायगुडे यांनी मत मांडले की कार्यरत प्रकल्पाविषयी आम्हांला काहीही बोलायचे नाही, मात्र नविन प्रस्तावित प्रकल्प उत्पादनाविषयी माहिती सांगण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रस्तावित प्रकल्प हा कार्यरत प्रकल्पाच्या क्षेत्रातच कार्यान्वित होणार आहे. त्यासाठी कुठेही अतिरिक्त जागा घेण्यात येणार नाही.

येथे उपस्थितांनी एकत्रितपणे आक्षेप नोंदविला की कार्यरत प्रकल्पामुळे स्थानिकाना जल,हवा,ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत आहे. त्यामुळे आम्हांला प्रस्तावित प्रकल्प हा नको आहे. कार्यरत प्रकल्पामुळे जो त्रास व हानी झाली, ती आता पुरेशी आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पात ज्या काही चुकी, त्रुटी झाल्या, त्या पुर्ण करण्यात आलेला आहे. नविन प्रस्तावित प्रकल्पात काही सामाजिक उपक्रमांचा गरज असल्यास ते सांगण्यात यावेत. ग्रामस्थांच्या सूचना, आक्षेप यांचे स्वागत आहे. स्थानीक लोक, शेतकरी प्रस्तावित प्रकल्पाविषयी

Scanned with OKEN Scanner

पर्यावरणविषयक सूचना/आक्षेप हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा यांना सादर करु शकता. आता केंद्र सरकार, राज्य सरकार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रकल्पास पर्यावरण संरक्षणासाठी कडक निर्देश पारित करतात. जर ते निर्देश पाळले नाही, तर ते अनुमती स्थगित करण्यात येते. आयोजक यांनीसुध्दा बैठकीच्या सुरवातीस सांगितलेले आहे की ही जनसुनावणी स्थानिकांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच आहे. येथे कुठलाही निर्णय होत नाही.

५) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

कार्यरत प्रकल्पात कुठले उत्पादन होते, ते किती होते, त्यासाठी कच्चा माल कुठला लागतो व प्रस्तावित प्रकल्पात कशाचे उत्पादन घेणार आहात याची माहिति स्थानिकांना त्यांना समजेल अशा भाषेत सांगण्यात यावे. त्यावेळी-

६) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

आता कार्यरत प्रकल्पात उत्पादन कुठले, त्याची क्षमता काय आहे, प्रस्तावित उत्पादनाची क्षमता किती, कुठला कच्चा माल वापरणार, त्यासाठी किती ट्रक्स रोज येतील, कोठून व कुठल्या रस्त्याने, उत्पादनात पाण्याची गरज प्रति दिन किती, उत्पादनासाठी पाण्याचा स्त्रोत, तसेच शून्य द्रव्य निःस्सारण प्रकल्प म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे काय त्यासाठी कुठली प्रणाली अंगिकारणार आहात ही माहिति सोप्या भाषेत स्थानिकांना सांगण्यात यावी.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी प्रकल्पाची सर्व तांत्रिक माहिती सांगण्यास सुरवात केली. त्यांनी प्रथम कार्यरत प्रकल्पाची तांत्रिक माहिती देताना स्पष्टीकरण दिले की कार्यरत प्रकल्प आर.एस.इथेनॉल आहे. आर.एस. म्हणजे परिसरात जे साखर कारखाना आहेत, त्या साखर कारखान्यातून रेक्टीफाईड स्पिरीट बनविले जाते. त्याच्यात ५-६% पाणी असते. येथे रेक्टीफाईड स्पिरीट आणले जाते व प्रकल्पात एक डिस्टीलेशन प्रोसेस असते. त्यात पाणी काढण्यात येते. ते पाणी ५-६% काढल्यानंतर जे उत्पादन तयार होते, त्यास इथेनॉल असे म्हटले जाते. हा उत्पन्न झालेला इथेनॉल भारत शासनाच्या ज्या तेल कंपन्या आहेत, त्यांना इथेनॉलची गरज आहे. भारत सरकारने इथेनॉल ब्लेन्डिंग कार्यक्रम जाहिर केलेला आहे. भारत सरकारला, देशाला या इथेनॉल उत्पादनाची गरज आहे. हा इथेनॉल पेट्रोलमध्ये ब्लेन्डिंग करण्यात येतो. रेक्टीफाईड स्पिरिटमधून काढलेले सुमारे ५-६% पाण्यावर प्रकल्पात ईटीपीमध्ये एनॉरबिक (anaerobic) एइरेशन (aeration) प्रक्रिया करण्यात येऊन, त्यातील बीओडी, सीओडी कमी करुन प्रकल्पातच कुलिंग टॉवरसाठी त्याचा वापर करण्यात येतो. सदरहू प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे.

तसेच प्रस्तावित नविन प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज -झेडएलडी) असणार आहे. त्याशिवाय भारत सरकार प्रकल्पास मंजूरीच देत नाही. तसेच सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित झाल्याशिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रकल्प कार्यान्वित करण्यास परवानगी देणारच नाही. पूर्वीच्या कार्यान्वित प्रकल्पातील ईटीपी हा तेवढा सक्षम (sufficient capacity) नव्हता. त्यामुळे त्याची कार्यक्षमता कमी होती.

मात्र नविन प्रकल्पात अत्याधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार असून आपल्यातील जाणकार, तज्ज्ञ व्यक्ती कंपनीच्या प्रदूषण नियंत्रण विभागासोबत एकत्रित चोवीस तास बसून त्यांच्यासोबत प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची कार्यक्षमता तपासू शकता आणि आपण आपला अहवाल शासनास सादर करु शकता. हे इथेनॉल प्रकल्पाविषयी माहिती पूर्णपणे सांगितली आहे

तसेच नविन प्रकल्पातील इथाईल एसिटेट बाबत माहिती सांगत आहे. कार्यान्वित प्रकल्पातच नविन आधुनिक प्रणाली स्थापित करुन इथाईल एसिटेट प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी सुध्दा रेक्टीफाईड स्पिरीट बाहेरुन आणण्यात येणार आहे. इथाईल एसिटेटमध्ये पाणी असते, पण त्यात काही केमिकल्स असतात. इथेनॉल व इथाईल एसिटेट या दोन्हीसाठी प्रस्तावित प्रकल्पात एकत्रित ईटीपी तयार करण्यात येणार असून झेडएलडी प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. नविन प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाण्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. नविन प्रकल्पातील ईटीपीसुध्दा आपण प्रकल्पात येऊन त्याची पाहणी करु शकता. प्रकल्पाती तांत्रिक विभाग आपणास पाहणी अहवाल उपलब्ध करुन देईल.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी Common Hazardous Waste Treatment, Storage, Disposal Facility (CHWTSDF) ची सभासदत्व (Membership) घेतलेले आहे. त्याबाबत उपस्थितांना माहिती सांगण्यात यावी. तसेच TSDF ला आपले रोज किती क्षमतेचा (quantity) कचरा जाणार आहे?

त्यास उत्तर देताना पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईटीपीत पाणी शुध्द करण्यात येऊन जो उरलेला गाळ असतो, त्याची विल्हेवाट ही पुण्याला रांजणगांव येथे असणा-या संस्थेस -Facility -पुढील शास्त्रीय प्रक्रियेसाठी पाठविण्यात येतो. तो नियमाप्रमाणे येथे व कुठेही टाकता येत नाही. तसेच प्रकल्पात येणारा माल जो

Scanned with OKEN Scanner

प्लॅस्टिक ड्रम्स हे शासनाच्या अधिकृत्त विक्रेत्यासच विकण्यात येतील. तसेच प्रकल्पात जे वापरलेले तेल (Used Oil) असेल, तेसुध्दा रांजणगावला CHWTSDF ला शास्त्रीय विल्हेवाटासाठी पाठविण्यात येईल. परिसरात कुठेही इतरत्र फेकले जात नाही.

त्यावेळी उपस्थितांनी रांजणगावलाच ते नेले जाईल याबाबत काही विश्वासाहर्ता आहे का अशी विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार व प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी माहिती दिली की प्रत्येक टॅंकर्सचा संपुर्ण वर्षाचा अहवाल हा शासनास सादर करणे बंधनकारक आहे. तो दिला नाही तर शासन पुढील कारवाई करते.

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की रांजणगावची संस्था-Facility-(CHWTSDF)- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दरवर्षी प्रत्येक कंपनीकडून किती कचरा/मटेरियल आले व त्यावर करण्यात आलेली शास्त्रीय प्रक्रिया याबाबत माहिती सादर करत असते. ती माहिती देणे हे बंधनकारक आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी विचारणा केली की जर प्रकल्पात अपघाती आग (accidental fire) लागल्यास, केमिकल स्फोट झाल्यास आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) काय आहे, अपघात झाल्यास प्रकल्पातील कामगारांना आणि ग्रामस्थांना त्याची सूचना मिळण्याची काही यंत्रणा (म्हणजे सायरन/उद्घोषणा) उभी केलेली आहे काय, तसेच प्रकल्पात आग वा अपघात झाल्यास कामगारांमध्ये त्यावर मात करण्यासाठी/ जागृत्ती निर्माण करण्यासाठी वेळोवेळी रंगीत तालीम (mock drill) घेण्यात येते का,गावातील लोकांमध्ये व ग्रामस्थांचा रंगीत तालीममध्ये (mock drill) समावेश आहे वा नाही याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग (DDMS-District Disaster Management Section) यांच्याबरोबर समन्वय साधणे, आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) सादर करणे याबाबत स्पष्टीकरण.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की अध्यक्ष यांनी केलेल्या सूचना स्विकार्य आहेत.

**७) श्री दीपक धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा:-**

त्यावेळी श्री दीपक धायगुडे यांनी शंका व्यक्त केली की प्रकल्प प्रवर्तक फक्त आश्वासन देतात पण काहीही केले नाही. तसेच येथे ते काहीही करणार नाहीत.



Scanned with OKEN Scanner

जवळील नागरी वस्तीस प्रकल्पाचा कुठलाही त्रास होऊ नये, कंपनीच्या हद्दीबाहेर (wall compound) कोणाला त्रास होऊ नये अशी मागणी केली.

**पर्यावरण तांत्रिक सल्लागार** यांनी सांगितले की शासन त्याशिवाय प्रकल्पास मंजुरीच देत नाही. श्री दीपक धायगुडे यांनी नविन प्रकल्प नविन जागेत स्थापित करणार का याबाबत विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार यांनी आराखडा दाखवत कार्यरत प्रकल्पातच नविन प्रकल्प उभारणी करण्याची माहिती दिली.

८) **श्री संदीप चोपडे, राहणार-सुखेड,तालुका-खंडाळा,जिल्हा-साताराः-**

त्यांनी विचारणा केली की मागच्यावेळी कंपनीत आग लागली होतो, त्यावेळी कामगार पळून गेले होते. यावेळी तसे झाल्यास काय प्रतिबंधक उपाययोजना करण्यात येतील?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की प्रकल्पात अग्निरोधक सयंत्रणेसाठी (firefighting system) वेगळी आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच बैठकीत मा. अध्यक्ष यांनी केलेल्या सूचनेनुसार प्रकल्पग्रस्त गावात वेळोवेळी अपघाती आग व आपत्ती नियंत्रणाबाबत जागरुकतेसाठी शास्त्रीय माहिती उपलब्ध करणे, रंगीत तालीम (मॉक ड्रील) आयोजित करण्यात येईल. तसेच विविध गावातील लोकांनी शिफारस केलेल्या व्यक्तींचा मॉक ड्रीलमध्ये समावेश करण्यात येईल.

९) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) समावेश हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात असणारच. मात्र प्रकल्पात काही आपत्ती किंवा आग लागल्यास बाहेरिल लोकांना, नागरी वस्तींना त्रास होणार नाही याबाबत माहिती बैठकीत सांगण्यात यावी.

यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की जर एखादी आपत्ती उद्भवली, तर मुख्य रस्ता किती लांब आहे, किती वेळात अग्निशामक गाड्या प्रकल्प स्थानावर येतील, स्फोट झाला तर किती वेळात वैदकीय मदत व रुग्णवाहिका प्रकल्प स्थानावर येतील किंवा किती वेळात प्रकल्पातील व्यक्तींना वैदकीय मदत लागल्यास किती वेळात ती मिळेल याचे नियोजन तयार असणे आवश्यक आहे. याचे नियोजन आपण सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (ईआयए) समावेश करण्यात यावा.

त्यावेळी **पर्यावरण सल्लागार यांनी** हिंदीमध्ये सांगितले की ईआयए अहवालात चॅप्टर ७ मध्ये शासनाने मान्य केलेली एक प्रणाली (software) आहे, त्यास FAST म्हटले जाते. त्याच्या आधारे Risk and hazard (धोका आणि आपत्ती) या प्रकल्पाचा,

प्रकल्प परिसराचा अभ्यास केलेला आहे म्हणजे ०.५ एमएलला गळती झाली, ०.२५ एमएल ला गळती झाली किंवा संपुर्ण पाईप लाईनच धोकादायक होऊन गळती होते, जर आग लागली तर त्याचा प्रभाव किती दूरपणे जाईल, तसेच आपत्कालिन फोन नंबर्स, वैदकीय मदत नंबर्स, पोलिस यांते नंबर हे आपत्ती व्यवस्थापन योजनेत देण्यात आलेले आहेत.

**अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की वस्तूस्थिती अशी असते की आपत्ती निवारण करण्याचे तांत्रिक मुद्दे कोणालाही माहित नसतात. प्रकल्पात जो निम्नश्रेणीत (lower category working staff) कार्यरत कर्मचारी असतो, त्याला काहीही माहित नसते. उदाहरण - व्हीओसी आहे, तेथील वास (odour) यामुळे जवळ काम करणा-या कर्मचा-यांचे डोळे चुरचुरणे असे होईल काय, तर काय करावे हे माहित नसते.

**पर्यावरण सल्लागार यांनी** सांगितले की प्रकल्पातील प्रक्रियेची reaction/प्रतिक्रिया ही खूपच कमी असेल. मात्र टँक गळती झाली तर आग लागू शकते. त्यांनी सांगितले की मा. अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार कंपनीतील कर्मचारी व अधिकारी यांना Risk and hazard लक्षात घेऊन विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच परिसरातील विविध गावांमध्ये याबाबत मॉक ड्रिल वेळोवेळी आयोजित करुन त्यात स्थानिकांना सूचविलेल्या व्यक्तींचा सहभाग करणे आवश्यक आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सूचना केली प्रस्तावित प्रकल्पातील Risk and hazard लक्षात घेऊन प्रकल्प प्रवर्तकांनी २-३ शिबिरे विविध गावात आयोजित करणे गरजेचे आहे. बैठकीत उपस्थितांनी तक्रार केली की येथील ५० बक-यां या प्रकल्पाने सोडलेल्या औद्योगिक सांडपाण्यामुळे मरण पावल्या आहेत. तर स्थानिकांमध्ये प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पातील Risk and hazard लक्षात घेऊन जनजागृत्ती करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पात लागणारा कच्चा माल हा किती आणणार, तो धोकादायक आहे काय, रस्ता चांगला आहे का, रोज किती ट्रक्स कच्चा माल येईल याची माहिती स्थानिकांना देणे आवश्यक आहे. तसेच कच्चा मालाचा ट्रक्सची गळती जर रस्त्यात झाली, तर त्याबाबतचे आपत्ती व्यवस्थापन आपण केलेले आहे काय?

पर्यावरण प्रकल्प सल्लागार यांनी हिन्दीमध्ये अभिवचन दिले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी परत सूचना केली की प्रकल्पात कन्डेनसेट कुठला, स्क्रबर कुठला आहे, Activated Carbon Filter आहे काय, स्टॅक उंची किती ठेवावी लागते, माणूस उभा राहिला तर जे प्रदूषके येतात,



Scanned with OKEN Scanner

त्याला त्याचा काय त्रास होईल, तसेच कुठली प्रदूषके चिमणीतून वर जातील, तसे lick detection plan काय आहे हेही स्थानिकांना सांगण्यात यावे. नियमित देखरेख (monitoring), व्हीओसी देखरेख (monitoring) याबाबत सांगण्यात यावे. हिवाळा व उन्हाळ्यातील हवेची गुणवत्ता हे वेगवेगळी असते, air quality control, ground level concentration याविषयी स्थानिकांना अवगत करण्यात यावे. हरितपट्टा विकसित करताना कुठली झाडे लावणार, कुठल्या प्रजातींची झाडे लावण्यात येणार आहे याबाबत स्पष्टीकरण स्थानिकांना द्यायलाच पाहिजे. तुम्ही फक्त तांत्रिक सादरीकरण केल्यासारखे सांगतात हे चूक आहे. कंपनीने नेमलेल्या पर्यावरण सल्लागार यांनाही व्यवस्थित माहिती सांगता येत नाही. पर्यावरण व्यवस्थापन योजनेत (ईएमपी) भांडवली खर्च व आवर्ती खर्च हा योग्य वाटत नाही. कारण ९.२३ आवर्ती खर्च कमी वाटतो. त्याबाबत खर्चाची तरतुद ही कमी वाटते.

तसेच प्रकल्पाविषयीचे माहितीचे पत्रक (Notice Board)/बॅनर्स सर्व प्रकल्पबाधित गावांमध्ये लावलेले पाहिजेत. तसेच प्रकल्पात व प्रकल्पाबाहेर do & don"ts चे माहिती देणारे बोर्ड हे लावलेले पाहिजेत. म्हणजे लोकांना त्याबाबत कळेल. ते घातक कचरा आहे, म्हणून जाणार नाहीत.

**१०) <u>श्री संग्राम धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-साताराः-</u>**

कंपनीकडे येणार रस्ता इतका खराब आहे की टँकर जर पलटी झाला, तर परिसरात मोठी आपत्ती होईल याचा विचार कंपनी व्यवस्थापनाने कधिही केला नाही. प्रकल्पातील इथेनॉलची दुर्गंधी ही पाच कि.मी. लांब जाते. त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनांना पाठिंबा दिला.

**उपस्थितांनी सामुहिकपणे आक्षेप नोंदविला** की या जनसुनावणीबाबत कंपनीने गावात बॅनर्स लावणे अपेक्षित होते. स्थानिकांना या जनसुनावणीची माहिती नव्हती.

येथे **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी स्पष्टीकरण दिले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीची सार्वजनिक सूचना बैठकीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याचबरोबर प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा सर्व पर्यावरणीय दस्तावेज हा सर्व प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयात सर्व जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेला होता. सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना सूचना देण्यात आलेली होती की त्यांनी याबाबत योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner

११) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

प्रकल्पात सर्व उत्पादने हे घातक केमिकल्स (Hazardous Chemicals) आहेत. अध्यक्ष यांनी उपस्थित केलेल्या सूचनांनुसार आपण ईआयए अहवालात पान नं. २९३ वर ऑनसाईट व ऑफसाईट प्लॅन बनविलेला आहे. मात्र तो येथील स्थानिकांना समजेल अशा भाषेत गावागावात जाऊन सांगण्यात यावा. काही दिवसांपूर्वी प्रकल्पात अपघात/स्फोट झालेला होता. त्याची संपूर्ण माहिती ग्रामस्थांना देण्यात आलेली आहे काय? ग्रामस्थांमध्ये प्रकल्पाविषयी भिती निर्माण झालेली आहे. ती दूर करण्यात यावी. आपली सर्व पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) हे त्यांना कळेल अशा सोप्या भाषेत मराठीत उपलब्ध करुन त्यांच्यासोबत समन्वय साधण्यात यावा.

येथे **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सूचना केली की सर्व पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) या मराठीत ग्रामस्थांना उपलब्ध करुन देण्यात यावेत. जेथे शक्य असेल तेथे संक्षिप्त स्वरुपात करुन देण्यात यावेत.

१२) **श्री संग्राम धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-साताराः-**

कंपनीने रस्त्याच्या पलिकडे एक टॅंकर नेला. पावसाळ्याचे दिवस होते. टॅंकर चिखलात अडकला तर त्यांनी तो तेथेच सोडला. तेथील विहिरीचे पाणी खालच्या भागात जात असते. ते समजले म्हणून बरे झाले, नाहीतर खालच्या भागातील लोकांना ते प्यायले असते तर काय झाले असते? तेथे जीवितहानी झाली असती तर त्यास जबाबदार कोण?

**उपस्थितांनी सामुहिकपणे आक्षेप नोंदविला** की कुठल्याही शेतात जाऊन औद्योगिक सांडपाणी सोडतात, त्यास आमिष दाखवून दबावात ठेवतात.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सूचना केली की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार ग्रामस्थांची बैठक बोलविण्यात यावी.

**त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक** यांनी आश्वासन दिले की वेगळा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करुन त्याची सर्व माहिती गावक-यांना अवगत करण्यात येईल.

**श्री संग्राम धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा** यांनी मत मांडले की जे आश्वासन कंपनी बैठकीत देत आहे, त्याप्रमाणे ४-५ वर्षे कंपनी व्यवस्थापनाने कंपनी चालवून दाखववावी, नंतर सर्व ग्रामस्थ त्याचे सर्व अवलोकन करुन मगच पुढील निर्णय घेईल. मात्र आता आमचा प्रकल्पास विरोधच आहे. ज्या सूचना करण्यात आल्या, त्याचे पालन कंपनीस करुन द्यावे. ४-५ वर्षांनी सर्व ग्रामस्थ नंतर पुढील निर्णय घेतील.



Scanned with OKEN Scanner

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी आपल्या आक्षेपांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**श्री संग्राम धायगुडे, राहणार-सुखेड, तालुका-खंडाळा,जिल्हा-सातारा** यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना आक्षेप नोंदविला की आपण येताना येथील रस्त्याची स्थिती पाहिलेली आहे. ज्यांची गुरे, जनावरे आहेत. येथे डांबरी रस्ता नाही. जर एखादा टँकर पलटी झाला तर त्या धुळीमुळे बाजूच्या लोकांना त्रास होतो, त्याबाबत कंपनी काय उपाययोजना करणार आहेत.

**यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी रस्ता करण्यास काय अडचणीबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की गावात येणारा रस्ता कंपनीतर्फे पूर्णपणे दुरुस्त करण्यात येईल.

**एका उपस्थितांनी** त्यावेळी कंपनीस परवानगी देऊ नये असे मत मांडले. त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** ही बैठक प्रकल्पास अनुमती प्रदान करण्यासाठी नाही, तर आपले सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आहे. त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येऊन ते शासनास सादर करण्यात येतील. त्याबाबत पुढील निर्णय शासन घेते. तसेच जर लेखी आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते नोंदवू शकतात. त्यास अजून दोन दिवस मुदत देण्यात येते. त्यामुळे आपणास अभ्यास करुन काही मुद्दे समजले असल्यास ते आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सातारा कार्यालयात लेखी स्वरुपात नोंदवू शकतात.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी बैठकीत उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविण्याचे आहेत, त्यांनी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, एस.टी. स्टँडच्या पाठीमागे, सदरबझार, सातारा येथे कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. त्याची पोच देण्यात येईल.

आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि त्यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

Scanned with OKEN Scanner

जाहिर जनसुनावणीच्या विरोधात किंवा बाजूने एक(०१) लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झाले आहे.

**(अमोल आ.सातपुते)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,सातारा

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(नागेश पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा - सातारा



Scanned with OKEN Scanner